**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2016 = 6.17, www.srjis.com*
*UGC Approved Sr. No.49366, JULY-AUG 2017, VOL- 4/35*

# उद्योजकता विकासातील शिक्षक भूमिका

**के. एस. खैरनार, Ph. D.**
*(सहयोगी प्राध्यापक), म.वि.प्र. समाजाचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नाशिक-२ (महाराष्ट्र)*
*ई-मेल : kirankhairnar.121@gmail.com*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रास्ताविक-**

उद्योजकता ही एक अर्थशास्त्रीय संकल्पना असून ती काळानूसार, परिस्थितीनूसार आणि बदलत्या संदर्भानूसार बदलत जाऊन व्यापक बनत आहे. उद्योजकता या संकल्पनेत गुंतवणूक करणे, उत्पादनाची संधी शोधणे, उत्पादन प्रक्रिया सुरु करणे, भांडवल उभारणे, कामगार, कच्च्या मालाचा पुरवठा करणे, दैनंदिन कामकाजासाठी व्यवस्थापकांची निवड करणे यांचा समावेश होतो.

उद्योजकता हे उद्योजकाने करावयाचे व्यापक कार्य आहे. कार्यांची व्याप्ती गुंतवणूक व उत्पादनाची संधी शोधण्यापासून व भांडवल उभारणी करण्यापासून तो व्यवस्थापकाची नेमणूक करण्यापर्यंतची आहे. उद्योजकतेत नफा मिळवणे, नफ्याचे प्रमाण टिकवून ठेवणे, वस्तु व सेवांचे उत्पादन करणे या बाबी महत्वाच्या ठरतात. नफा मिळविणे हे उद्योजकतेचे उद्दिष्ट असून ते मानवी व्यवहाराशी संबंधित आहे. उद्योजकता ही एक सृजनात्मकक्रिया असून ती विकसित करण्यासाठी व्यक्तिगत क्षमतेचा उपयोग करुन घेतला पाहिजे. उद्योजकतेमधून नवनिर्मिती होत असते.

राष्ट्रीय व्यवस्थेच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये नवनवीन आव्हाने यशस्वीपणे स्वीकारण्याच्या प्रक्रियेत उद्योजकांची भूमिका महत्वाची असते ही भूमिका प्रभावीपणे पार पाडण्यासाठी उद्योजकाला अनेक जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. उद्योजकता म्हणजे उद्योजकाला विविध जबाबदाऱ्या स्वीकारुन त्या पार पाडण्याला प्रवृत करणारी मानसिकता होय. उद्योजकतेचा संबंध केवळ औद्योगिक क्षेत्राशी नसून तिचा परीघ फार व्यापक आहे. मानवी जीवन, समाज जीवन व मनुष्याचे सर्व दैनंदिन व्यवहार उद्योजकतेच्या परिघामध्ये समाविष्ट आहेत.

**उद्योजकता आणि समाज-**

**उद्योजकता** ज्या समाजात आहे तेथे उद्योजक असतात. ज्यासमाजात उद्योजकतेचा विकास होतो तेथे उद्योजक निर्माण होतात. उद्योजकांच्या प्रयत्नामधून उद्योजकतेचा विकास होत असतो. उद्योजकांशिवाय उद्योजकतेचा विचारसुध्दा करता येणार नाही. उद्योजकतेमुळे उद्योजक सक्रिय होऊन भांडवलाची गुंतवणूक

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

होऊन बेकारांना रोजगारांच्या संधी निर्माण होतात. समाजातील लोकांची क्रयशक्ती वाढून समाजाच्या प्रगतीला मदत होते. शिक्षण प्रक्रिया व उद्योजकता ही प्रभावी समाजाच्या निर्मितीकरिता कारणीभूत ठरते.

**उद्योजकता विकसित करण्यासाठी शिक्षकांची भूमिका**–

**भारत** हा विकसनशील देश आहे. भारताचा आर्थिक, सामाजिक विकास होण्यासाठी शिक्षकांची भूमिका महत्त्वाची ठरते. उद्योजकता विकसित होण्यासाठी शिक्षकांनी शालेयस्तर, महाविद्यालयीन स्तरावर व्यापक भूमिका निभावणे अत्यावश्यक आहे.

१) विद्यार्थ्यामध्ये प्रबळ मानसिक भावना निर्माण करणे. निवडलेल्या उद्योगधंद्याबाबत प्रोत्साहन देऊन त्यामध्ये यश संपादन करणे.

२) निवडलेल्या उद्योगासंदर्भात जोखीम स्विकारणे. उद्योजकांची जोखीम स्वीकारण्याची प्रवृत्ती नसते. सर्व बाबींचा विचार करुन जोखीम स्वीकारण्याची मानसिक तयारी शिक्षकांनी करुन घ्यावी.

३) व्यक्तीच्या जीवनात अनुभवाला फार महत्त्व असते. अनुभवातून उद्योजकतेचा विकास होत असतो.

४) उद्योजकतेच्या विकासासाठी उद्योजकांना स्वतंत्रपणे काम करु देणे आवश्यक असून त्यांना ते आवडते. स्वातंत्र्यामुळे ध्येय सफल होण्यास मदत होते म्हणून उद्योजकतेच्या वृध्दीसाठी स्वातंत्र्य महत्त्वपूर्ण ठरते.

५) उद्योजकतेच्या विकासासाठी जोखीम न पत्करता सर्व निर्णय विचारपूर्वक घेऊन कामाचे काळजीपूर्वक नियोजन करुन यश निश्चितपणे मिळेल या स्वरुपाची आशा बाळगणे आवश्यक असते.

६) उद्योजकतेसाठी प्रयत्न, निर्धार, जोम अंगी आवश्यक असून त्यातून यश निश्चित मिळेल अशी भावना विकसित करणे गरजेचे आहे. कोणत्याही कार्य सिध्दीसाठी प्रयत्न, निर्धार, जोम आवश्यक आहे याची जाणीव शिक्षकांनी करुन देणे गरजेचे आहे.

७) उद्योजकाने भुतकाळात झालेल्या चुकांची पुनरावृत्ती होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. उद्योजकाने भुतकाळापासून शिकून वर्तमानकाळात राहून भविष्यकाळाचा विचार करुन चांगल्या योजनांची आखणी केली पाहिजे. वर्तमानकाळाच्या वास्तवाचे पूर्ण भान ठेवून भविष्यकाळातील दृष्टीकडे वाटचाल करावी.

८) उद्योजकतेच्या विकासासाठी उद्योजकाला आपल्या सर्व कर्मचाऱ्यांकडून योग्य प्रकाराचे सहकार्य मिळाले पाहिजे. कर्मचारी वर्गाने शिस्त व नियमांचे पालन करुन कठोर परिश्रम करण्याची तयारी ठेवावी.

९) भांडवलाची कमतरता ही उद्योजकांसमोरील एक महत्वाची समस्या असते. उद्योगांचा विकास करण्यासाठी, भविष्यातील उपक्रमांचा विस्तार करण्यासाठी भांडवलाची आवश्यकता असते.

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

१०) आज प्रत्येक क्षेत्रामध्ये स्पर्धा मोठ्या प्रमाणात वाढत आहे. उद्योजकांना वाढत्या स्पर्धेला तोंड द्यावे लागत असते. उद्योजकांची मानसिकता स्पर्धेकरिता स्पर्धा करावयाची नसून इतरांशी जुळवून घेऊन आपले हित साधणे महत्त्वाचे आहे हे पटवून दिले पाहिजे.

**उद्योजकतेसंदर्भातील भ्रम**-

**शिक्षण** प्रक्रियेमुळे व्यापक दृष्टीकोन तयार होऊन विचारास मोठ्या प्रमाणात चालना मिळते. मनातील सर्व प्रकारचे वैचारिक स्वरुपाचे भ्रम दूर झाल्याशिवाय बदलाचा मार्ग मोकळा होत नाही. घरातील जळमटे ज्या पद्धतीने आपण दूर करतो त्याच पद्धतीने भ्रम दूर करण्याची आश्यकता असते. भ्रम दूर झाल्यानंतर जोखीम स्विकारणे, उद्योगांचा विस्तार करणे, आव्हाने स्विकारणे, प्रयत्नांची शर्थ करण्यासाठी उद्योजक तयार होत असतो. उद्योजकतेसंदर्भात खालील भम्र दिसून येतात.

१) **उद्योजक बनण्याची योग्यता स्त्री मध्ये नसते**-

उद्योजकता व संरक्षण क्षेत्र केवळ पुरुषांसाठी आहे ही धारणा स्त्री व पुरुष यांच्या मनात पूर्वी होती. आज ही धारणा बऱ्याच प्रमाणात दिसून येते. समाजात शिक्षण घेण्याचे प्रमाण वाढून स्त्रिया उच्चशिक्षण, तांत्रिक शिक्षण, शास्त्रीय शिक्षण घेऊन प्रभावी उद्योजक बनु शकतात. जीवनाच्या सर्व क्षेत्रामध्ये घडून आलेल्या परिवर्तनामुळे (शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय) परिस्थिती मोठ्या प्रमाणात बदलत आहे.

२) **श्रीमंत व्यक्ती उद्योजक बनते**- श्रींमत व्यक्तीजवळ उद्योग स्थापन करण्यासाठी भरपूर भांडवल असते अशा व्यक्ती उद्योगात यशस्वी होतात असे समजणे चुकीचे आहे. सरकार उद्योगांची स्थापना करण्यासाठी मोठ्या प्रमाणात सोयी-सुविधा उपलब्ध करुन देत आहे. त्यामध्ये भांडवल पुरवठ्याबरोबर माहितीची उपलब्धता, तांत्रिक स्वरुपाचे ज्ञान, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, बाजारपेठ यांचे महत्त्व वाढत आहे.

३) **प्रशिक्षण घेणाऱ्या व्यक्ती यशस्वी उद्योजक बनतात**- उद्योजकतेचा विकास ही एक शैक्षणिक स्वरुपाची प्रक्रिया आहे. मानवी संसाधनाचा विकास करणे, योग्यता प्राप्त व्यक्तींना प्रशिक्षण देऊन त्यांच्यामध्ये उद्योगासाठी आवश्यक कौशल्याची निर्मिती करुन उद्योग स्थापनेकरिता मदत करणे प्रशिक्षणात आवश्यक असते. त्याबरोबरच उद्योजकीय वैशिष्ट्ये, उद्योजकीय जबाबदारी पेलणे, तज्ज्ञ व अनुभवी व्यक्तींचे मार्गदर्शन महत्त्वपूर्ण ठरते.

**समारोप**-

**भारतीय** समाजाला सध्या यशस्वी उद्योजकांची गरज आहे. उद्योजकांमध्ये कार्यसिध्दी, भविष्याचा वेध घेणे, नवीन व्यावसायिक संधी शोधणे, जोखीम स्वीकारुन परिश्रम करणे, सृजनात्मक विचार करणे, मानवी संबंध जोपासणे, व्यवसायाबद्दल निष्ठा बाळगणे यासारख्या गुणांचा अंतर्भाव असणे अत्यावश्यक आहे.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

समाजामध्ये उद्योजकतेसंदर्भातील महत्त्व पटवून दिले पाहिजे. शिक्षण हा घटक यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावतो. भारत हा विकसनशील देश असल्याने भारताचा विकास साधण्यासाठी शिक्षक भूमिका व कार्य महत्त्वपूर्ण ठरेल. शालेयस्तर व महाविद्यालयीन स्तरावर उद्योगासंदर्भात प्रोत्साहन देऊन एक यशस्वी उद्योजक बनण्यासाठी मार्गदर्शन करणे हे विकसित भारतासाठी प्रगतीचे पाऊल ठरेल.

**संदर्भ ग्रंथ**

*प्रभाकर देशमुख (२००२), **उद्योजकता विकास,** नागपूर : पिंपळापूरे अॅण्ड कंपनी पब्लिशर्स*
*वि. कडवेकर, रवींद्र कोठावदे, (२००६) **व्यावसायिक उद्योजकता,** पुणे : डायमंड पब्लिकेशन्स*
*जनार्दन वाघमारे (२००६), **बदलते शिक्षण : स्वरुप आणि समस्या,** पुणे : पद्मगंधा प्रकाशन*
*अनंत जोशी (२००३), **शिक्षक प्रशिक्षण,** नाशिक : कुलसचिव, य.च.म.मु. विद्यापीठ*

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*